मुंबई, सोमवार, १९ ते २५ फेब्रुवारी २०१८
मनपा समाचार

## थोडक्यात

### कर्जाचे पैसे परत मागितले म्हणून महिलेचा विनयभंग आणि मारहाण

मुंबई : कर्ज म्हणून दिलेले पैसे मागण्यासाठी गेलेल्या महिलेचा विनयभंग करत तिला मारहाण केल्याचा प्रकार मालाडमध्ये उघडकीस आला आहे. या प्रकरणी चारकोप पोलिसांनी शुक्रवारी तिघांना अटक केली असून चौकशी सुरू आहे. नारायण रहेजा (५८), गोपाल रहेजा (२०) व लोकेश रहेजा (२८) अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत.



चारकोप पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार मीनाक्षी नंदा (३०) या गोराईत पती आणि मुलासोबत राहतात. त्यांचे पती व्यावसायिक आहेत, तर मुलगा शाळेत शिकतो. मालाडमध्ये राहणारी गायत्री रहेजा (२०) ही नंदा यांच्या मुलाची शिकवणी घ्यायला यायची. यातून त्यांची ओळख झाली. याच दरम्यान रहेजाला पैशांची गरज असल्याचे तिने नंदा यांना सांगितले. पैसे लवकर देण्याच्या शर्तीवर नंदा यांनी रहेजाच्या बँक खात्यात दहा लाख रुपये पाठवले. त्याच्या बदल्यात रहेजाकडून एक चेक घेतला. मात्र, ठरल्या वेळेनुसार नंदा यांनी जेव्हा चेक बँक खात्यात जमा केला तेव्हा तो बाऊन्स झाला. यावरून नंदा आणि रहेजामध्ये वाद झाले. अखेर नंदाने रहेजाच्या घरी जाऊन पैसे मागण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्या रहेजाच्या घरी पोहोचल्या. त्या ठिकाणीदेखील पैशांवरून त्यांच्यात वाद झाले आणि नंदा यांना रहेजा कुटुंबीयांनी मारहाण करत त्यांचा विनयभंग केला. या प्रकरणी नंदा यांनी चारकोप पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. चौकशीअंती तिघांना पोलिसांनी अटक केली.

### बांगलादेशातून बनावट नोटा ठाण्यात !

ठाणे .निश्चलनीकरणाने बनावट नोटांना पायबंद बसेल, हा केंद्र सरकारचा दावा फोल ठरल्याचा प्रत्यय पुन्हा आला आहे. ठाण्यातील वागळे इस्टेटमधील धर्मवीर परिसरात नव्या दोन हजार आणि ५०० रुपयांच्या तब्बल दोन लाख ३१ हजार रुपयांच्या बनावट नोटा खंडणीविरोधी पथकाने जप्त केल्या आहेत. या प्रकरणी एकाला अटक झाली असून, या नोटा बांगलादेशातून झारखंडमार्गे ठाण्यात आणल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. प्रकाश प्रसाद ऊर्फ शंकर टोकल माहतो (४२, रा. झारखंड) असे अटक झालेल्या आरोपीचे नाव आहे. तो महिनाभरापासून या परिसरात राहत होता. २४ लाख रुपयांच्या बनावट नोटा तो विकणार



असल्याची माहिती ठाणे खंडणीविरोधी पथकाला मिळाली होती. याआधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप शर्मा, पोलीस निरीक्षक राजकुमार कोथमिरे यांच्या पथकाने मंगळवारी रात्री सापळा रचून त्याला अटक केली. त्याच्याकडे दोन हजारच्या ११३, पाचशेच्या १०, शंभरच्या दोन बनावट नोटा सापडल्या. झारखंडच्या हजारीबाग जिल्ह्यातील हेमलाल पंडित या मित्राकडून त्या विकत घेतल्याची माहिती त्याने पोलिसांना दिली. हेमलाल याचा शोध आता सुरू असून, त्याच्या अटकेनेनंतर बनावट नोटा पुरविणारी मोठी साखळी उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### ऑइल सांडल्याने वाहतुकीला अडथळा

ठाणे.ठाण्यातील पोखरण रस्त्यावर शनिवारी सकाळी ऑइलपेंट सांडल्यामुळे येथील रस्ता वाहनांसाठी धोकादायक झाला होता. दुचाकीस्वारांच्या अपघाताची शक्यता निर्माण झाल्यामुळे आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकाने येथील ऑइलवर माती टाकून परिस्थिती नियंत्रणात आणली. शहरामध्ये प्रत्येक वळणावर आणि अन्य ठिकाणी अशाच प्रकारच्या घटना सातत्याने घडत असतात. आपत्ती व्यवस्थापन विभाग अपघात टाळण्यासाठी ही कारवाई करत असल्याचे पथकाकडून स्पष्ठ करण्यात आले. पोखरण रस्त्यावर सिंघानिया स्कूल असून या भागात मोठ्या प्रमाणामध्ये वाहने येत असतात. दुचाकीवरून आपल्या मुलांना सोडण्यासाठी येणाऱ्यांची संख्याही अधिक असते. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडून नये यासाठी ही दक्षता घेण्या आली होती.

### एमबीबीएस विद्यार्थ्याची आत्महत्या

नवी मुंबई.कामोठे येथील एमजीएम मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएसचे शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याने कामोठे येथील राहत्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून उडी टाकून आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त होत आहे. विमलकुमार पिल्लई (२४) असे या विद्यार्थ्याचे नाव आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये विमलकुमार हा एकाच विषयात नापास झाला होता. त्यामुळे त्याने आत्महत्या केल्याचे बोलले जात आहे. विमलकुमार हा मूळचा तामिळनाडूचा असून सध्या तो एमबीबीएसच्या शेवटच्या वर्षात शिकत होता. विमलकुमारचे आई-वडील गोरेगाव येथे रहाण्यास होते, मात्र तो कामोठे सेक्टर १७मधील जयगुरुदेव कॉम्लेक्समध्ये भाड्याने फ्लॅट घेऊन वर्गमित्रासह रहात होता. शनिवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास विमलकुमार जयगुरुदेव इमारतीच्या पहिल्या मजल्यावर जखमी अवस्थेत पडल्याचे सुरक्षारक्षकाच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्याला तत्काळ एमजीएम रुग्णालयामध्ये नेण्यात आले. त्याच्यावर उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. मात्र त्याच्या घरात सुसाइड नोट सापडली नाही, तसेच त्याला इमारतीवरून उडी टाकतानाही कुणी पाहिलेले नाही. त्यामुळे तो पाय घसरून पडला की, त्याने स्वत: उडी टाकली, याबाबत संशय व्यक्त करण्यात येत आहे.

# कधी होणार या दबंग आमदारावर गुन्हा दाखल ?

**चंद्रपुर :** चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील शिवसेनेचे आमदार सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांची दबंगगिरी कॅमेऱ्यात कैद झाली आहे. आमदार धानोरकर यांनी आपल्या कार्यकर्त्यांना हाताशी घेऊन महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. आमदार महाशय वीज कर्मचाऱ्याच्या कानशिलात लगावताना आणि कार्यकर्ते दांडुक्याने बेदम मारहाण करताना दिसत आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात विजेचे पोल



उभारण्याचे काम मागील काही दिवसांपासून सुरु आहे. छत्तीसगड आणि तेलंगाणातून येणाऱ्या विद्युत वाहिनीसाठी चंद्रपूर जिल्ह्यातील शेतजमिनीवर टॉवर उभारले जात आहेत. त्यामुळे हजारों एकर जमिनीवरील पिके उद्‌ध्वस्त होत आहेत. स्थानिक शेतकऱ्यांचा टॉवर उभारण्याच्या कामाला विरोध आहे. विरोध केला जात असतानाही शेतजमिनीवर टॉवर उभारण्याचे काम सुरुच आहे. याप्रकरणी स्थानिक शेतकऱ्यांनी शिवसेना आमदार सुरेश धानोरकर यांच्याकडे तक्रार केल्यानंतर वीज कर्मचाऱ्यांना मारहाण करण्यात आली. आमदार सुरेश धानोरकर सोमवारी आपल्या कार्यकर्त्यांसह राजुरा तालुक्यातील भुरकुंडामध्ये पोहोचले. पोल उभारणाऱ्या वीज कर्मचाऱ्यांना हटकले. इतकेच नाही तर त्यांचा चारही बाजुंनी घेरले. आमदार धानोरकर आणि कार्यकर्त्यांनी वीज कर्मचाऱ्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. आमदार धानोरकर यांनी कार्यकर्त्यांना रोकण्याऐवजी स्वत:ही कर्मचाऱ्यांचे कान शेकत हात धुवून घेतले. या मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाला असून शिवसेना आमदाराविरोधात तीव्र शब्दात प्रतिक्रिया उमटत आहेत.

## पिसाळलेल्या कुत्र्याने मुलासह आईवर केला हल्ला

**नाशिक :** देवळाली कॅम्प – वीट भट्टीवर काम करणाऱ्या मजुरांच्या झोळीत झोपलेल्या अवघ्या दीड वर्षाच्या मुलावर मोकाट कुत्र्याने हल्ला करत त्याला भक्ष्य केले. झोळीत झोपलेल्या तान्हुल्याला पाजण्यास गेल्यानंतर त्या मातेच्या हा प्रकार लक्षात आला. कुत्र्याच्या तावडीतून सोडवताना आई गंभीर जखमी झाली. शनिवार (दि. १०) सकाळी वडगाव पिंगळा येथे ही हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. याप्रकरणी रविवारी



(दि. ११) सिन्नर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडगाव पिंगळा गावातील वीट भट्टीवर ऋषिकेश पवार आणि त्यांची पत्नी जनाबाई पवार हे काम करतात. त्यांना लक्ष्मी, राजेंद्र व कांचन अशी तीन अपत्य आहेत. सकाळी कामावर जाताना जनाबाईने तान्हुला कांचन (वय दीड वर्ष) यास झोळीमध्ये झोपवले. काही वेळाने मुलगा झोपेतून उठल्याने त्याला दूध पाजून येते, असे सांगत जनाबाई जात असताना झोळीमध्ये तिला हालचाल दिसली. त्यामुळे त्या धावतच झोळीजवळ पोहचल्या. तेव्हा लहानग्या कांचनचे कुत्रा लचके तोडत असल्याचे दिसले. कुत्र्याने जनाबाईवरही हल्ला केला. आरडाओरड केल्याने कामगारांनी धाव घेत कुत्र्याला पिटाळले. गंभीर जखमी कांचन आणि मातेला बिटको रुग्णालयात हजर केले. मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी कांचनला मृत घोषित केले. महापालिकेने पकडलेले मोकाट कुत्रे कर्मचारी शहराच्या लगत असलेल्या गावांमध्ये सोडतात. त्यांना भक्ष्य न मिळाल्याने ते कासावीस होतात आणि नागरिकांवर हल्ले करतात. वडगाव पिंगळामध्येही शंभर ते दीडशे मोकाट कुत्र्यांचा वावर आहे. यातील काही हिंस्त्र झाल्याने बालकांना भक्ष्य बनवत आहेत.

## ठाणे परिवहनची अपुरी सेवा

ठाणे. ठाणे महापालिका क्षेत्रातील सुमारे २४ लाख नागरिकांना सेवा देण्यासाठी टीएमटी प्रशासनाकडे अवघ्या १६५ गाड्या उपलब्ध असून खासगी कंत्राटदारामार्फत १९० बस धावत असून सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्टच्या निकषानुसार परिवहनकडे ४०० बसचा तुटवडा असल्याचे समोर आले आहे. टीएमटी अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये परिवहन व्यवस्थापकांनी याची कबुली दिली असून पुढील टप्प्यामध्ये या बससेवा आणण्याचा प्रयत्न असल्याचा दावा त्यांनी केला आहे. सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट (सीआयआरटी) पुणे संस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पुरवण्यासाठी १ लाख लोकसंख्येस ३० बसगाड्या या प्रमाणामध्ये गाड्यांची उपलब्धता असण्याची गरज आहे. या निकषानुसार ठाण्यातील २४ लाख लोकसंख्येला ७२० बसगाड्या आवश्यक आहेत. परंतु प्रत्यक्षात अवघ्या ३५५ बस ताफ्यात असून त्यापैकी अनेक बस बंद अवस्थेत असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. ठाणे शहराच्या सीमा चारही दिशांना विस्तारत असून अनेक लांबच्या भागामध्ये मोठी नागरी वस्ती झाली आहे. शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना त्यांना सुविधा देणारी सार्वजनिक वाहतूक मात्र अद्याप वाढलेली नाही. त्यामुळे खासगी वाहने,




रिक्षा आणि अन्य वाहनांना पसंती दिली जात असून त्यामुळे नागरिकांना वाहतूककोंडी आणि प्रदूषणाच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागत आहे. ठाणे महापालिकेची अत्यावश्यक सेवा असलेल्या टीएमटीच्या ताफ्यामध्ये सीएनजीवर चालणाऱ्या १०३ व डिझेलवर चालणाऱ्या १७४ अशा एकूण २७७ गाड्या असून त्यापैकी बऱ्याच गाड्या बंद आहेत. १६५ गाड्या कशाबश्या रस्त्यावर धावत असतात. त्याच बरोबरच गेल्यावर्षी जेएनआययुएम योजनेअंतर्गत ११० नॉन एसी स्टॅण्डर्ड बस व ८० नॉन एसी मिडी बसेस अशा एकूण १९० बसेस कंत्राटी पद्धतीने चालवण्यात येत आहे. परंतु त्यामध्येही वारंवार बिघाडाची परिस्थिती निर्माण होत असल्यामुळे ही सेवाही पूर्ण क्षमतेने रस्त्यावर उतरत नसल्याचेही दिसून येते. त्यामुळे सीआयआरटीसीच्या नियमानुसार ठाणे शहरामध्ये पुरेशी बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना खासगी वाहतुकीवर अवलंबून रहावे लागत आहे. ठाणे महापालिकेच्यावतीने टीएमटीला बळकटी आणण्याचा प्रयत्न केला जात असून पर्यावरणाभिमुख प्युअर इलेक्ट्रॉनिक्सच्या १०० बस खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासंदर्भातील निर्णय प्रक्रिया झाली असून युटोपिया एनर्जी या कंपनीला २०१६ साली कार्यदिश देण्यात आले होते. परंतु अद्याप या बसगाड्यांसाठी इलेक्ट्रॉनिक चार्जिंग स्टेशनचा प्रश्न असल्यामुळे या बसगाड्या रस्त्यावरून धावू शकलेल्या नाहीत. परंतु मार्च २०१८ अखेरपर्यंत या गाड्या ताफ्यात दाखल होण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. त्याचबरोबर १०० बायोइथेनॉल इंधनावर चालणाऱ्या पर्यावरणपूरक बसगाड्या घेण्याची प्रक्रिया सुरू असून ट्रॅव्हल्स टाइम कार रेंटल प्रा. लि आणि स्कॉनिया कमर्शियल व्हेईकल यांच्या निविदांनाही मंजुरी मिळाली आहे. यापैकी ५५ बसेस पुढील काळात ताफ्यात येण्याची शक्यता आहे. तर तेजस्वीनी ही महिलांसाठी विशेष ५० बसगाड्याही ताफ्यात येणार असून अशा २०० बसगाड्या पुढील वर्षभरामध्ये दाखल होण्याची शक्यता आहे.

## कल्याणमध्ये आधारकार्ड केंद्र पडले बंद



**ठाणे :** केडीएमसीच्या येथील विभागीय कार्यालयात आधारकार्ड मिळण्याची व्यवस्था नागरीकांसाठी उपलब्ध करून दिली होती. परंतू नोंदणी (टोकण)कुठे करायची यावरून झालेल्या वादात हे केंद्र गुरूवारपासून बंद करण्यात आले आहे. तांत्रिक कारणामुळे आधारचे काम बंद राहील असा फलक केंद्राबाहेर लावण्यात आला असून केंद्र चालक कैलास डोंगरे यांनी सोयी सुविधा पुरविण्याबाबत केडीएमसीकडे मागणी केल्याने आता महापालिकेच्या भुमिकेकडे लक्ष लागले आहे. महापालिकेच्या विभागीय कार्यालयातील वाचनालयाच्या जागेत राज्यमंत्री व आमदार रवींद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने कायमस्वरूपी आधारकार्ड केंद्र सुरू करण्यात आले आहे. आधारकार्डासाठी याठिकाणी मध्यरात्रीपासूनच नागरीकांच्या रांगा लागतात. परंतू तीनपैकी केवळ दोन युनिटच सध्या चालू असल्याने रांगा लावूनही नंबर लागत नसल्याने नागरीकांची पुरती परवड झाली आहे. दरम्यान केंद्रावर वाढती गर्दी आणि मध्यरात्रीपासून बाहेर लागत असलेल्या रांगा पाहता सुरक्षेच्या अनुषंगाने केंद्रचालक डोंगरे यांनी नवीन आधार नोंदणी व सुधारीत आधार कार्डसाठी टोकण हे सावरकररोडवरील जाणता राजा कार्यालयात सायंकाळी ४ ते ५ यावेळेत मिळेल असे फलक केंद्राबाहेर लावले होते. पण याला आरटीआय कार्यकर्ते महेश निंबाळकर यांनी हरकत घेत नोंदणी एखादया राजकीय (भाजपच्या) पक्षाच्या कार्यालयात का ? असा सवाल केला. यावर डोंगरे यांनी नोंदणीसाठी निंबाळकर यांच्याशी संपर्क साधावा असे फलक केंद्राबाहेर लावल्याने दोघांमध्ये बुधवारी जोरदार वाद झाला होता. या वादात नागरीक वेठीला धरले गेलेच त्याचबरोबर हे केंद्र बंद पडण्याची शक्यता वर्तविली जात होती. ती शक्यता गुरूवारी प्रत्यक्षात उतरली. त्रांतिक कारण पुढे करीत हे केंद्र बंद करण्यात आले आहे. त्यामुळे सकाळपासूनच केंद्रावर आधारकार्ड काढण्यासाठी आलेल्या नागरीकांना बंदच्या सूचना पाहून माघारी परतावे लागले. दरम्यान नोंदणीच्या उदभवलेल्या वादानंतर आता विभागीय कार्यालयातूनच टोकण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पण केंद्रावर मनुष्यबळाची कमतरता आणि सुरक्षेचा अभाव असल्याने नोंदणीसाठी मनुष्यबळ महापालिकेने पुरवावे अशी मागणी केंद्रचालक डोंगरे यांनी प्रभाग क्षेत्र अधिकारी परशुराम कुमावत यांच्याकडे केली आहे. यावर महापालिकेडून कोणती कार्यवाही होते याकडे लक्ष लागले आहे. मात्र जोपर्यंत मनुष्यबळ पुरविले जात नाही तोपर्यंत केंद्र चालू न करण्याचा निर्णय घेतल्याचे डोंगरे यांनी सांगितले.

## भाजपाने शिवजयंतीनिमित्त मीरारोडमध्ये लावलेल्या बॅनर वरून वादंग

मीरा रोड – भाजपाचे अहमदनगर महापालिकेतील उपमहापौर श्रीपाद छिंदम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्यावरुन तीव्र निषेध व्यक्त होऊन छिंदमला अटक झाली असल्याची घटना ताजी असतानाच मीरा भाईंदरमध्ये भाजपाने शिवजयंती निमित्त लावलेल्या बॅनर वरून वादंग निर्माण झाला. मनसे, मराठी एकीकरण समिती, रिपब्लिकन सेना, शिवमावळा संस्था आदींनी भाजपाच्या बॅनरवर महाराजांना चक्क काही वादग्रस्त पदाधिका-यांच्या सोबत एकाच रांगेत स्थान दिल्याने निषेध करत गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली.



वाढता तणाव पाहून पोलिसांनी भाजपाचा वादग्रस्त बॅनर काढायला लावला. भाजपाच्या वतीने शिवजयंतीनिमित्त शुभेच्छा देणारा लांब आकाराचा बॅनर हा मीरा रोडच्या सिल्वर पार्क जंक्शनवर अनधिकृत म्हणून तोडलेल्या इमारतीवर लावण्यात आला होता. या बॅनरवर एका ओळीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार नरेंद्र मेहता, भाजपा जिल्हाध्यक्ष हेमंत म्हात्रे, महापौर डिंपल मेहता, नगरसेवक अरविंद शेट्टी, भाजपाचे संजय थरथरे व फिरोज शेख यांची छायाचित्र असून महापौर व शेट्टी यांच्या छायाचित्रादरम्यान शिवाजी महाराजांचे छायाचित्र आहे. या बॅनर बद्दल रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष रोहित आसले, शिवमावळाचे नामदेव काशिद, राजेश जाधव, मराठी एकीकरण समितीचे गोवर्धन देशमुख, मनसेचे दिनेश कनावजे, सचिन पोपळे आदींनी आक्षेप घेतला. छत्रपती शिवाजी महाराज आराध्य दैवत असताना त्यांना भाजपाच्या काही वादग्रस्त पदाधिकाऱ्यांच्या रांगेत बसवणे हा महाराजांचा अवमान असून तो कदापी सहन करणार नाही, असा पवित्रा आंदोलकांनी घेतला . नगरसेवक अरविंद शेट्टीचे तर ऑक्रेस्ट्रा बार-लॉज असून वेश्या व्यवसायप्रकरणी पीटा सह अन्य गुन्हे त्यांच्यावर दाखल आहेत. आमदार मेहता, थरथरे, शेख आदी वादग्रस्त असून त्यांच्यावर देखील गुन्हे तसेच तक्रारी आहेत. अशा वादग्रस्तांसह अन्य पदाधिकाऱ्यांच्या रांगेत महाराजांचे छायाचित्र टाऊन त्यांचा अपमान केला गेला आल्याचा आरोप आंदोलकांनी केला. मराठी एकीकरण समिती, रिपब्लिकन सेनेने या बॅनरप्रकरणी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार देत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. बॅनरमुळे महाराजांचा अवमान झाला असून आमच्या भावना दुखावल्या आहेत. भाजपाला महाराज केवळ निवडणूक जिंकण्या पुरते आणि राजकीय स्वार्थासाठी लागतात.

मालक, मुद्रक, प्रकाशक सिकंदर इब्राहिम शेख यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ३-४, अमीन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रास रोड नं. २, गोरेगांव (पूर्व) मुंबई - ६३ येथे छापून शॉप नं. ४, ब्रम्हाड सर्कल, आजाद नगर,. साईनाथ बेकरी जवळ, कोलशेत रोड, घोडबंदर रोड, ठाणे पश्चिम ४००६०७ ठाणे येथून प्रकाशित केले आहे. हेल्पलाईन नं. ९३२२६६६६३८ कार्यकारी संपादक : आर. जे. शर्मा , उपसंपादक : सहदेव आनंदा म्हेत्रे email : manapasamachar@rediffmail.com पीआरबी कायद्यानुसार सर्व जबाबदारी तसेच सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी ठाणे न्यायालय क्षेत्रात येतील.